# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट: www.kallappannaawadejawaharsssk.com

## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत
**"बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय"**
या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष –**
**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**
**मा. श्री. सुरेश माने-पाटील**
(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**
**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा. श्री. आदगोंडा पाटील**
संचालक

**मा. श्री. जिनगोंडा पाटील (रूपाज)**
संचालक

**मा. श्री. अभयकुमार काश्मिरे**
संचालक

**मा. श्री. गौतम इंगळे**
संचालक

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**भूषण कोले**
सि. ॲग्री ओव्हरसियर,
(इचलकरंजी विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : मंगळवार दि. २५/०४/२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजता.

**स्थळ** : प्रथमाचार्य शांतिसागर हॉल (जैन मंदीर), **दानोळी**


ऊस पिक परिसंवाद


ऊस पिक परिसंवाद
ता. शिरोळ जि.कोल्हापूर



पुढारी

# योग्य नियोजनाने एकरी १०० टन ऊस शक्य : सुरेश माने-पाटील

**दानोळी : पुढारी वृत्तसेवा**

शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून आपल्या उसाचे उत्पादन एकरी १०० टन काढता येते, असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुण्याचे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांनी व्यक्त केले. येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्यातर्फे प्रथमाचार्य शांतिसागर हॉलमध्ये आयोजित ऊस विकास योजनेअंतर्गत ऊस पीक परिसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केन कमिटीचे चेअरमन डॉ. राहुल आवाडे होते.

माने-पाटील पुढे म्हणाले, वाढत्या तापमानाचा ऊस वाढीवर परिणाम होतो. त्यासाठी पिकाचे पाण्यातील फेरातील अंतर कमी करावे. हुमनी किडींचा सामूहिक नायनाट करावा. ठिबक सिंचनाचा वापर करून आपल्या उत्पन्नात वाढ करावी. रासायनिक खतांचे योग्य नियोजन करून थोडे थोडे पण सातत्य ठेवावे.



दानोळी : येथे ऊस पिक परिसंवाद कार्यक्रमात सुरेश माने-पाटील, राहुल आवाडे व इतर मान्यवर.

बुरशीजन्य रोगासाठी प्राथमिक अवस्थेतील रोपांची लागवड हाच एकमेव पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. गारपिटीसारख्या परिस्थितीत उसाची पाने फाटल्यानंतर पिकाची वाढ योग्य दिशेने चालू ठेवण्यासाठी या काळात युरिया व अमोनियम सल्फेट यांचा डोस द्यावा. रासायनिक खते देताना शक्यतो शेणखतात मिक्स करून भट्टी लावूनच शेताला दिल्यास चांगले रिझल्ट मिळतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सरपंच सुनीता वाळकुंजे, कवठेसारचे सरपंच पोपट भोकरे, महादेवराव धनवडे, स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष रामचंद्र शिंदे, व्हा. चेअरमन बाबासाहेब चौगुले, रावसाहेब भिलावडे, गौतम इंगळे, आप्पासाहेब तेरदाळे, बापूसाहेब दळवी, उपसरपंच विपुल भिलवडे, रावसाहेब पाटील, भास्कर पट्टणकूडे, भूषण कोले, प्रवीण चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक किरण कांबळे, सूत्रसंचालन एस. टी. पाटील तर आभार बाळासो पाटील यांनी मानले.